# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०२३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**सूचना -** प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या नक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री गुरु-राहू-वक्री हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील व तो बौद्धिक, लेखन, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. येथील वक्री हर्षलही उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. पण हे दोन्ही ग्रह वक्री असल्याने अपेक्षित प्रगती व यश लाभेलच याची खात्री देता येत नाही. येथील राहूमुळे सतत अपमान होणे संभवते. तसे झाल्यास मनात डूख धराल. शिवाय त्याच्यामुळे वातविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारच्या कलावंतांना आपल्या कलेत प्रगती करण्यास अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत बुध अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्याने त्याचा प्रभाव दिसून येणार नाही. रवि महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. त्याच्यामुळे हितशत्रूचा पराभव होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होणार असला तरी तो केंद्रस्थानी असल्याने लाभदायक होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून अस्तंगत मंगळ व केतु असे दोन ग्रह आहेतच. पण हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात आणि भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत वक्री शनि असून तो अर्थप्राप्तीस व संततिसुखास बाधकच होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत .वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता येऊन नैराश्य येणे संभवते. श्रद्धा असेल तर "श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे गृहसौख्य लाभेल व शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत जात आहेत. पण बुध अस्तंगत असल्यामुळे त्याचा अनुकुल -प्रतिकुल परिणाम दिसून येणार नाही. पण रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल व अनारोग्यकारकच होईल, पण तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी प्रथमपासून केतु व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह असून येथील केतु सर्व प्रकारे

अनुकुलच होईल; पण मंगळ अस्तंगत असल्यामुळे त्याचे अनुकुल -प्रतिकुल परिणाम सांगणे शक्य होत नाही. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या स्वराशीत वक्री शनि असून तो नोकरी किंवा व्यवसाय काहीही असणारांना प्रतिकुलच होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे कुमार्गी मित्रांचा उपद्रव सहन करावा लागेल. व विविध प्रकारे आर्थिक समस्या मनस्ताप देतील. या राशीच्या व्यय स्थानी मेष राशीत वक्री गुरु -राहू व वक्री हर्षल असे तीन ग्रह असून राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते. पण येथील हर्षल सर्व दृष्टीनी प्रतिकुल होणार असल्याचेच जाणवते. तसेच येथील गुरु शुभ असून तो अध्यात्मास व सामाजिक कार्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती होणे संभवत नाही. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकराची “ व “ श्रीहनुमानाची “ उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. तसेच काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होऊ शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत बुध अस्तंगत असल्यामुळे त्याच्यामुळे घडणारे बरे-वाईट परिणाम सांगता येणार नाहीत. पण रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, दु:ख, आर्थिक चिंता, अपघात, संतति समास्या, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपासून होणारा दुरावा अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून अस्तंगत मंगळ व केतु असून येथील मंगळामुळे स्थावरसंबंधी समस्या व संततीपैकी कोणाच्या अयोग्य आचरणाची समस्या मनस्ताप देईल. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. तसेच येथील केतू अध्यात्म व गूढ संशोधनाची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होणार असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती होणे व आर्थिक लाभ होणे संभवत नाही. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून तो व्यापार-व्यवसाय काहीही असणारांना प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशीच राहील. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री गुरु-वक्री हर्षल व राहू असे तीन ग्रह असून राहूमुळे ज्या मंडळींना अधिकार पद प्राप्त झाले आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन प्राप्त करून घेण्याचा जबरदस्त मोह अस्वस्थ करील. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो मोह आवरावाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. येथील हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होतील, व सर्व काही अनिश्चित असेच घडेल. तसेच येथील गुरु सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक असला तरी तो वक्री असल्यामुळे त्याच्यामुळे सुखासुखी जे अपेक्षित ते मिळेलच याची खात्री देता येत नाही. श्रद्धा असेल तर “श्रीशिवोपासना “ आणि “श्रीदुर्गा देवी”ची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे आणि “श्रीदुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम

नमः:शंकराय” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, धनलाभ होईल व सर्व सुखाचेच घडेल. या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सुखसमाधान लाभेल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कार्यकुशलतेवर प्रसन्न होतील, पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, कौटुंबिक त्रास, कार्य दिरंगाई, अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. येथील बुध अस्तंगत असल्यामुळे त्याच्यामुळे साधकबाधक काय घडेल ते सांगता येत नाही. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतु व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील केतूमुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील, आणि तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. येथील मंगळ अस्तंगत असला तरी कौटुंबिक सुखास प्रतिकुल होण्याचीच शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो वक्री असल्याने अधिकच प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अपघात, विचित्र आजार होणे, कसली तरी भीती त्रस्त करणे, दु:ख, दैन्य अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल.. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून तो आध्यात्मिक उपासनेस अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे उपासनेत सुखासुखी प्रगती होणे संभवत नाही. तसेच त्याच्यामुळे परदेशगमनाची संधी असली तरी तो वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे पार करूनच प्रवास करावा लागेल. पण काही मंडळींना सूचक स्वप्ने पडण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू -वक्री गुरु -वक्री हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहू शासकीय नोकरदार मंडळींना अनुकुल असून त्याच्यामुळे काही मंडळींना बढती,अधिकारपद असे काही मिळणे संभवते. पण येथील गुरु आणि हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असले तरी ते दोनही ग्रह वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे सहन करूनच जेवढी प्रगती होईल त्यात समाधान मानावे लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत शुक्रअसून त्याच्यामुळे सुख,चैन, ऐषाराम असे सर्व सुख मिळेल. या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे वित्तहानी होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कार्यकुशलतेवर प्रसन्न होतील, काही मंडळींना बढती, काहींना मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते.पण बुध अस्तंगत असला तरी प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत प्रथमपासून अस्तंगत मंगळ व केतु असे दोन ग्रह

आहेतच. . पैकी येथील मंगळ शुभ व अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्याने त्याच्यासंबंधी काही वर्तविणे अशक्य वाटते. येथील केतूमुळे मनस्ताप व मानसिक दु:ख सहन करावे लागण्याची दाट शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो वक्री असल्याने या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका, बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत वक्री गुरु, राहू आणि वक्री हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे या राशीच्या काही मंडळींना बढती, अधिकार पद मिळू शकेल; तर क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. तसेच येथील गुरु व हर्षल अनुक्रमे आध्यात्मिक उपासनेस व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल व प्रगतिकारक असले तरी ते दोन्ही ग्रह वक्री असल्याने आपल्या कार्यात अपेक्षित प्रगती करण्यास अनुकुल होणे दंभवत नाही. श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन"शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करा.

**(६) कन्या -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि व अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्यांच्यामुळे अनारोग्य, चिंताभय, मनस्ताप, थकवा येणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, चित्त अस्थिर, चंचल होणे, मित्रद्रोह होणे, कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी प्रथमपासून केतु व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रहही प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य व आर्थिक समस्या मनस्ताप देण्याची दाट शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होणे, गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते. पण तो वकी असल्याने दशम या व्यवसाय स्थानास पूरक होण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात संकटे, बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू-वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे तीन ग्रह असून येथील गुरु अचानक धनदायक असला तरी वक्री असल्याने तसे घडण्याची शक्यता दिसत नाही. तसेच येथील हर्षल अपघातकारक असल्यामुळे घरीदारी सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. येथील राहू अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अस्वस्थ करील. या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत शुक्र असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे क्षणिक सुख, चैन, ऐषाराम असे सर्व सुख मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीभगवान शिवशंकराची आणि दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे आणि "दुर्गादेवी स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशा

परिस्थितीत  हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात  प्रतिकुलच होतील. व रविमुळे शरीरपीडा, मानभंग होणे, अनारोग्य होणे, कसली तरी  चिंता अस्वस्थ करणे, मनस्ताप होणे व त्यामुळे थकवा येणे संभवते. बुध  प्रतिकुल असला तरी अस्तंगत असल्याने विशेष काही घडेलसे वाटत नाही. या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून केतू व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पण येथील मंगळ अस्तंगत असल्याने फारसा प्रतिकुल होणे संभवत नाही. पण येथील केतू अनुकुल असून तो  सुखकारकच होईल' पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्याने सतत वाहन सावधानतेने चालवा व रस्त्याने जाताना सावधानतेने मार्गक्रमण करा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ या स्वराशीत वक्री  शनि असून त्याच्यामुळे बुद्धी विकृत, व्यवहारी आणि  अति स्वार्थी होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येईल, विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळे येतील. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन  राशीत  वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता  अस्वस्थ करतील.  शिवाय फसवणूक झाल्याचा मनस्तापही सहन करावा लागेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत वक्री गुरु- वक्री हर्षल आणि राहू असे तीन ग्रह असून येथील वक्री गुरूमुळे प्रेमसंबंधात अडचणी येणे संभवते. विवाहयोग असला तरी त्यात विविध कारणांनी  बाधा येण्याची शक्यता जाणवते. तसेच प्रवासातही मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. येथील वक्री हर्षलमुळेही  विवाहितांच्या वैवाहिक जीवनात व भागीदारीत व्यापारव्यवसाय असणारांच्या व्यवसायात अशा काही घटना घडतील की त्यामुळे  असलेले प्रेमाचे, विश्वासाचे संबंध तुटण्याची परिस्थिती  निर्माण होईल.  येथील राहूमुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील व विवाहितांच्या वैवाहिक जीवनात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत शुक्र असून तो अनुकुल होईल  व सर्व प्रकारे सुखसमाधान व मन:शांती लाभेल.  श्रद्धा असेल तर भगवान शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती  लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा,  ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या  राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ या स्वराशीत  वक्री शनि असून त्याच्यामुळे गृहसौख्यात बाधा येऊन असह्य दु:ख सहन करावे लागेल. व त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल व  तो अध्यात्म आणि गूढ संशोधन  यांची आवड असणारांना अनुकुल होणार असला तरी तो वक्री असल्यामुळे उपासनेत व  गूढ संशोधन कार्यातील प्रगतीत   अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री गुरु, वक्री हर्षल आणि राहू असे तीन ग्रह आहेत. पैकी येथील राहू ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना  अनुकुल  व लाभदायक होईल. येथील गुरु वक्री असला तरी त्याच्यामुळे आरोग्य बरे राहील.  तसेच येथील हर्षल मात्र वक्री असल्याने डोकेदुखीचा आजार त्रस्त करील. म्हणून सतत खोल विचार करत बसू नका. नपेक्षा मेंदूविकाराचा आजार त्रस्त  करील. या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे नोकरी -व्यवसायात अडचणी, अडथळे येऊन मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत रवि व अस्तंगत  बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील व त्यांच्यामुळे सुखसमाधान लाभेल व नोकरीत काही मंडळींना बढती मिळेल तर क्वचित कोणास एखादे उच्च पद  मिळू शकेल. बुधामुळे धनलाभ व मित्रलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे

प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल.व त्यांच्यामुळे शरीरपीडा, मानभंग, मानहानी होणे संभवते. नियोजित कार्य असफल होईल. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून केतु व अस्तंगतं मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील केतुमुळे स्वभाव लहरी, चंचल, अस्थिर असा होणे संभवते. मंगळ अस्तंगत असला तरी प्रतिकुलच होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो वक्री असल्याने नवी उत्तम नोकरी किंवा नवे कार्यक्षेत्र मिळण्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. शिवाय भावंडविषयक एखादी चिंता ट्रस्ट करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यन असून त्याच्यामुळे घरगुती गोष्टींबाबत घोटाळे, , गैरसमज आशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री गुरु, वक्री हर्षल आणि राहू असे तीन ग्रह असून येथील राहू प्रतिकुल असून त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात, संततीपैकी कोणाच्या गंभीर अनारोग्याची समस्या, नोकरीत वरिष्ठांचा जाच,
प्रिय जनांपासून होणारे दूरत्व अशापैकी घटना घडणे संभवते. गुरु आणि हर्षल हे दोन्ही ग्रह बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होणार असले तरी ते वक्री असल्याने सहजासहजी प्रगती होणार नाही, सुखसमाधान लाभणार नाही. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा प्राप्त होईल. ऐषाराम, सुसंगती सुखसमाधान लाभेल. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह अनुकुलच होतील व रविमुळे नोकरी-व्यवसायात प्रगती होईल, आर्थिक लाभ होतील, काही मंडळींचा सन्मान होईल तर क्वचित कोणास उच्च पद मिळणेही संभवते. पण बुध अस्तंगत असल्यामुळे काही देऊ शकला नाही तरी त्याच्यामुळे काही विपरीत असे घडणार नाही. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून अस्तंगत मंगळ व केतू असे दोन ग्रह आहेतच. पण येथील मंगळ प्रतिकुल असला तरी अस्तंगत असल्याने फारसे विपरीत असे घडणे संभवत नाही. पण येथील केतू अनुकुल असून त्याच्यामुळे यश, धनलाभ, सुखसमाधान लाभेल व प्रवासयोग येतील. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः:”तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता जाणवते. त्याशिवाय आर्थिक चिंताही त्रस्त करण्याची शक्यता वाटते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. शिवाय तो अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्यास अनुकुल असला तरी वक्री असल्याने

उपासनेत व गूढ  संशोधनात  सहजासहजी प्रगती होणे संभवत नाही.  या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री गुरु-वक्री हर्षल व राहू असे तीन ग्रह असून राहूमुळे कौटुंबिक त्रास, कटकटी सहन कराव्या लागण्याची शक्यता जाणवते. येथील गुरु कौटुंबिक सुखास अनुकुल असला तरी वक्री असल्याने फारसा अनुकुल होणे संभवत नाही. पण त्याच्यामुळे नातेसंबंधातील कोणाकडून  तरी मनस्ताप दिला जाण्याची दाट शक्यता दिसते. तसेच येथील हर्षलमुळेही   कोणाशी पटणार नाही, आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत शुक्र असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षित अर्थलाभ होईल व ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते.  काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे  संभवते.  या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत  बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी तुळा  राशीत जात  आहेत.अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह  महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्यांच्यामुळे मानसिक ताण, भय,निराशा, वडील मंडळींचा विरोध, भांडणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह अनुकुल  होतील व सर्व काही मनोनुकुल असेच घडेल.  या राशीच्या दशम स्थानी  तुळा  राशीत प्रथमपासून केतु  व  अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पण येथील मंगळ अस्तंगत  असल्याने फारसा प्रतिकुल होणार नाही; पण त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच येथील केतूमुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण मनावर ताबा ठेवून त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:"तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:"तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या  प्रथम (लग्न) स्थानी याच स्वराशीत वक्री शनि असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कुटुंबातील  प्रिय जनांपैकी  कोणाशी दूरत्व निर्माण होणे संभवते. अनारोग्याचा त्रास होईल, नियोजित कार्यात अडथळे येतील, पण त्याच्यामुळे प्रवासयोग असला तरी तो सुखाचा होईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक संकटे त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री गुरु-वक्री हर्षल- राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु व हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असले  तरी ते वक्री असल्याने सुखासुखी प्रगतिकारक व यशदायक होणे संभवते नाही. शिवाय  गुरुमुळे एखाद्या भावंडाकडून

मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. तसेच येथील हर्षल परदेशगमनास अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील.  या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी तुळा  राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्छा-आकांक्षा अपूर्ण राहणे, संततिसुखात बाधा येणे, मानसिक ताण सहन करावा लागणे, वडील

मंडळींचा विरोध सहन करावा लागणे, त्यामुळे नैराश्य येणे संभवते. बुध पूर्वार्धात अनुकुल होणार असला तरी तो अस्तंगत असल्याने व महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होणार असल्याने फारसा अनुकुल होणे संभवत नाही. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत प्रथमपासून अस्तंगत मंगळ व केतु असे दोन ग्रह आहेतच पण येथील मंगळामुळे प्रवास सुखाचा होईलच असे नक्की सांगता येणार नाही. तसेच येथील केतुमुळे ढोंगी, धूर्त असे आचरण कराल व त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः “ तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय कोमल होणे संभवते. तसेच मानसिक संवेदना अति जलद होतील. त्यातून नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री गुरु-वक्री हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु नोकरी-व्यवसायास व कौटुंबिक सुखास अनुकुल व लाभदायक असला तरी तो वक्री असल्याने सुखासुखी सर्व काही घडण्याची शक्यता दिसत नाही. येथील हर्षलमुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल, अविचाराने खर्च कराल, आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही ध्यानात येणार नाही व हातून विचित्र आचरण घडणे संभवते. येथील राहूमुळे अपमान झाल्यास मनात सूडभावना प्रज्वलित होईल. तसेच त्याच्यामुळे वातविकाराचा आजार होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे कोणत्याही कलेत उच्च कलागुण असूनही कलेत अधिक प्रगती होणे संभवत नाही. कलागुण व्यक्त करण्यास संधीच मिळणार नाही. असे घडल्यास काही कलावंत व्यसनाधीन होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत रवि आणि अस्तंगत बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा प्रीस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, दु:ख होणे, अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे संभवते. बुध केवळ महिन्याच्या उत्तरार्धातच अनुकुल होणार असला तरी तो अस्तंगत असल्याने फारसा अनुकुल होणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून अस्तंगत मंगळ व केतु असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळ अनारोग्यकारक होईल, ,त्याच्यामुळे हाडमोड होणेही संभवते.जपा. शिवाय तो जलभयकारक व विष-भयकारक असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच रस्त्यावरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. येथील केतूही प्रतिकुलच असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच तो अपघातकारक व अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे आर्थिक संकटे असह्य मनस्ताप देतील. त्यातून मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====